Historicity Research Journal Impact Factor : 1.9152 (UIF)
ISSN : 2393-8900 Volume - 3 | Issue - 12 | Aug – 2017

# संतश्रेष्ठ कवयित्री जनाबाई

प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले
मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, पे.पंप, जवाहरनगर,भंडारा.



## प्रस्तावना :—

तेराव्या शतकात संत साहित्य उदयास आले. ज्ञानेश्वरानी व नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीला प्रारंभ केला. या चळवळीत त्यांच्या सोबत अठरापगड जातीतील अनेक संत सामिलझाले. ज्ञानदेव, नामदेव, गोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, जोगा—परमानंद, नरहरी सोनार, विसोबा खेचर, चोखामेळा, बंका महार आणि जनाबाई. यात जनाबाईचे स्थान स्त्री संत म्हणून अत्यंत महत्त्वाचे, स्वतंत्र, स्वयंभू व श्रेष्ठ स्वरूपाचे ठरले आहे.

भक्तिचा अत्यंत सोपा मार्ग सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या जनाबाईचे अभंग उत्कृष्ठ भावकविताही ठरली आहे. ‘संतवाटिकेतील जाईची वेल’ असे जिसे मोहक वर्णन केले जाते. परमेश्वर प्राप्तीची तळमळ व आर्तता यांतून त्यांच्या बऱ्याचशा अभंगाची निर्मिती झाली असली तरी स्वत:चे भावजीवन, संतांच्या उत्कट सहवासातील क्षण आणि स्त्री व अस्पृश्य असल्याच्या कारणाने जीवनाला आलेली कष्ठमयता अत्यंत तरल स्वरूपात वर्णन केली आहे. ती संत साहित्यातली एक क्रांतिसम अभंग वाटचालच होती. त्यामुळे यादवकालीन सर्व संतमंडळीत जनाबाईचे स्थान त्यांचे जीवन, व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक बांधिलकी हयामुळे स्वतंत्र आहे. तसेच ते वैशिष्टयपूर्णही ठरले आहे.

## लौकिक व्यक्तिमत्त्व :—

जनाबाई हे वर्णहीन (अस्पृश्य) समाजाच्या निकृष्ट पातळीवर जन्मास आलेले एक जीवन होते. त्या अस्पृश्यच समजल्या जात होत्या. बालपणीच आईवडिल निवर्तल्याने त्या मातृपितृसुखास वंचित झाल्या होत्या.

महाराष्ट्रातील परभणी जिल्हयात गोदावरी नदीच्या काठी ‘गंगाखेड’ गावी जनाबाईचा जन्म तेराव्या शतकात ‘दमा’ नावाच्या शुद्राच्या कुटुंबात झाला. दमा—करूंड यांची ही कन्या ‘जनाबाई’ हिला त्यांच्या आई वडिलांनी विठ्ठल भक्तीत समरस असणाऱ्या संत नामदेवांचे वडील दामाशेट यांना आध्यात्मिक संस्कारासाठी जनाबाई पाच—सहा वर्षाची असताना तिला अर्पण केले आणि काही अल्पशा दिवसातच करूंड व दमाचे निधन झाले. दामाशेटने हया अनाथ मुलीचे आपल्या कन्येप्रमाणे पालनपोषण केले.

दामाशेटीचे संपूर्ण कुटुंबच विठ्ठलभक्ती करणारे असल्यामुळे त्याचे संस्कार जनाबाईवर झाले. संतनामदेव हा दामाशेटचा मुलगा जनाबाईपेक्षा पाच—सहा वर्षानी लहान होता, पुढे हाच तिचा गुरू ठरला आहे. नामदेवावाचून जनाबाईना वेगळे असे स्वत:चे जीवन नव्हतेच. ‘म्हणे नामयाची जनी’ हया त्यांच्या प्रत्येक अभंगाच्या अखेरीस येणाऱ्या नाममुद्रेवरून त्याचा प्रत्यय येतो.

## वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व :—

जनाबाईचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व अत्यंत समृद्ध, स्वतंत्र व संत श्रेष्ठत्त्वास पात्र ठरले आहे. जनाबाईचे सुमारे ‘साडेतीनशे’ अभंग उपलब्ध आहेत.

जनाबाईंनी कृष्णजन्म, बालक्रीडावर अभंग रचना असून हरिश्चंद्राख्यान दशम अवतारांचे 'पवाडे'ही त्यांनी गायिले आहेत. त्यांनी हरिश्चंद्राख्यान लिहून तारामती रोहिदास आणि हरिश्चंद्र यांविषयीच्या भक्तांचे आदर्श उभे केले आहे. शिवाय थालीपाकतीर्थावळी, पाळणा दशावतारवर्णन आणखी काही स्फूटरचना केली आहे. त्यांनी 'नामदेव चरित्र', 'ज्ञानेश्वर चरित्र' लेखन केले. याशिवाय सोपान व ज्ञानेश्वरांच्या भावंडांविषयी त्रोटक चरित्रकाव्य रचली आहेत. तशी काही समकालीन संतांविषयी संक्षिप्त चरित्रकाव्य रचली आहेत. त्यात सेना न्हावी, चोखामेळा आणि गोरा कुंभार यांविषयी मार्मिक चरित्र लेखन केले आहे. याशिवाय अन्य स्फूट रचनेत रूपूकरचना, कूट, पाळणा, भूपाळी, झोपाळयावरील ओव्या इत्यादी रचना उपलब्ध आहे.

## जनाबाईचे काव्य : स्वरूप व वैशिष्टये :—

संत जनाबाईंनी आपल्या काव्यरचनेत समकालीन संत कविची प्रेरणा घेतली असली तरी त्यांनी स्वतंत्र स्वयंभू व वैशिष्टयपूर्ण रचनाही केली आहे. हे त्यांच्या काव्याचे वेगळेपण त्यांना श्रेष्ठत्वाकडे नेणारे ठरले आहे. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या कवितेतून जे विचार व भाव मांडले गेले त्यांचे प्रतिध्वनी जनाबाईच्या काव्यात उमटले असले तरी बऱ्याचशा अभंगातून त्यांच्या व्यक्तिगत अनुभूतीचे आणि आर्ततेचे प्रत्ययकारी चित्रण फार मौलिक आहे. या बाबतीत संत साहित्याचे अभ्यासक अ.ना. देशपांडे यांचे जनाबाईच्या काव्य स्वरूपाविषयीचे मत फार महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ''ती स्वतंत्र वळणाची. स्वतंत्र स्फुरणाची देशी कविता आहे. समाजाच्या खालच्या समजल्या गेलेल्या स्तरातील लौकीकदृष्टया दीन, दरिद्री असलेल्या जनसाधारणाची ही कविता आहे. जनपदमानसात उगम पावलेली ही भक्तिसरिता आहे.

जनाबाईच्या काव्याचा आध्यात्मिक अभ्यास सगुणभक्तीने प्रारंभ होतो, दास्यभक्ती, सख्यभक्ती आणि प्रेमभक्ती ही वळणे घेत सगुणभक्ती निर्गुणाच्या अंतिम वळणावर येऊन विश्रांत पावतो. या तिच्या काव्यप्रवासात जेव्हा भावकवितेचा प्रवास सुरू होतो, त्यात मात्र जनाबाईचे व्यक्तिमत्त्व झळाळून वर येते. त्यात नामदेवाविषयींचा कृतज्ञ भाव व्यक्त करण्यापासूनचा तर स्त्री म्हणून आणि अस्पृश्य म्हणून तिची झालेली कोंडी, त्यातले उत्कट सुखदुःख, जीवघेणे संघर्ष पदोपदी पडणारे पेच याविषयीचे तिच्या संवेदनशील मनाने उभे केलेले एक अनुभवविश्व जनाबाईच्या अभंगांना भावसमृद्ध बनवते. यात तिचे शूद्र म्हणून उपेक्षित असणारे जीवन, त्यांची श्रमजीवी अनुभवसृष्टी त्यातील त्यांची दुखदुःखे, घटनाप्रसंग, चढउतार, हर्ष—विमर्ष इत्यादी सर्वच अनुभूती जनाबाई आपल्या अस्सल वास्तव व दैनंदिन जीवनसरणीच्या भाषेत बोलतात. त्यामुळे त्यांची कविता साक्षात्कारी वाटू लागते.

त्यांच्या काव्यात नामदेवाची सगुणप्रीती व ज्ञानदेवांची योगानुभूती यांचा योग्य समन्वय साधलेला दिसतो. असाच समन्वय अनेक बाबतीत जनाबाईने साधला आहे. सगुण भक्ती—निर्गुण भक्ती, समरसतामुक्ती तसेच रचनेच्या बाबतीत विठ्ठल महिमा संत महिना, कुटुंबवत्सलता, अनाथाचे दुःख, जीवनाविषयीचे प्रेम, ईश्वराची आसक्ती याशिवाय त्यांच्या विविध काव्यरचनेमध्ये समकालीन संतांच्या अभंगरचनेची शिस्त तर स्वयंभू अनुभवासाठी जनसाधारणांची लौकीकभाषा अभिव्यक्ति यातून निर्माण झालेली लोकसंवादक्षमता, आवाहकता आणि परिणामकारकता या सगळया वैशिष्टयपूर्ण रचनेमुळे त्यांची कविता स्त्री—पुरूषांच्या मनावर असणारी मोहीन आजही तितकीच टवटवीत आणि चैतन्यमयी वाटते.

या दृष्टीकोनातून आशय—अभिव्यक्तीच्या अनुषंगाने जनाबाईच्या काव्याचा अन्वयार्थ काढताना जनाबाईची कविता तेराव्या शतकातील संत स्त्री कवयित्रीच्या काव्यप्रवाहात वेगळी व श्रेष्ठ जाणवते. हे तिचे वेगळेपण संतकाव्यातील क्रांतिप्रवर्तक म्हणावे लागेल.

## जनाबाईची नामदेवविषयीची कृतज्ञता :—

संत जनाबाई ही संतश्रेष्ठ नामदेवांच्या विठ्ठलभक्तीमय झालेल्या कुटुंबात वावरत होती. जनाबाईंना स्वतःचे कुटुंब, घर नव्हते. नामदेवाचं घर, कुटुंब हेच त्यांनी आपले घर व कुटुंब मानले त्यामुळे नामदेवाविषयी ती अनेकठिकाणी कृतज्ञता व्यक्ती करते.

‘‘धन्य मायबाप नामदेव माझा ।
तेणे पंढरिराजा दाखविले ।’’

असा जनाबाई कृतज्ञतापूर्वक नामदेवांचा उल्लेख करते.

## जनाबाईंचा ज्ञानेश्वरांविषयीचा प्रेमभाव :—

जनाबाई सगुण भक्ती करता—करता ज्ञानेश्वरांच्या अनुभवविश्वातही प्रवेश करते. नामदेवांप्रमाणे त्या सगुणांचा आत्यंतिक आग्रह धरीत नाही. तिला ज्ञानेश्वरांचा अद्वैतविचार अत्यंत सहिष्णु, स्वागतशील आणि परिपक्व वाटतो म्हणून ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा स्विकार करून ज्ञानेश्वराविषयी आज्ञार्थी भाव प्रकट करते. —

‘‘ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।।
मरोनियां जावें । बा माझ्या पोटीं यावें ।।
ऐसे करि माझ्या भावां । सख्या माझ्या ज्ञानदेवा ।।’’

## पंढरीमाहात्म्य :—

जनाबाईचे मूलत: एक अभिजात भक्तीमन होते. त्यामुळे नाम माहात्म्य, पंढरीमाहात्म्य व संतसंगमाहात्म्य यांचे त्या सुंदर वर्णन करतात.

‘‘पुंडलिक भक्तबळी । विठो आणिला भूतळीं ।।
अनंत अवतार केवळ । उभा विटेवरी सकळ ।।’’

वारकरी संप्रदायाने पुंडलिकाचे महत्त्वपूर्ण कार्य पायाभूत ठरविले होते. त्यामुळे जनाबाईंनी पुंडलिकाचे माहात्म्य आपल्या अभंगात अपरिहार्यपणे वर्णन केले आहे.

‘‘अनंत लावण्याची शोभा । तो हा विटेवरी उभा ।।’’
या व
‘‘पाय जोडुनी विटेवरी । कर ठेऊनी कटावरी ।।’’

या अभंगातून केलेले पांडुरंगाचे वर्णन मौलिक आहे.

याशिवाय ‘‘जनाबाईंनी गायिलेले संत माहात्म्यही त्यांच्या अभिजात प्रज्ञेचा व प्रतिभेचा सुजाण आविष्कार आहे.’’ असे डॉ. सुहासिनी इर्लेकर यांचे मत सार्थक वाटते. संत जनाबाईंनी व्यक्त केलेली ‘संत’ संकल्पना जनाबाई व्यक्त करतात.

‘‘संत हे कोण तरी देवाचे हे डोळे ।
पूजेविण आंधळे देवाचियेत
कोण्या नेत्रे देव पाहे तुजकडे ।
यासाठी आवडे संत करी ।।

## जनाबाईंचा भक्तवत्सलभाव व साक्षात्कार :—

भक्तवत्सलभाव व्यक्त केला आहे. जनाबाईच्या अभंगातून ‘विठ्ठलमाऊली आणि आपण त्याचे सान अजाण लेकरू’ सारखा ‘मी तुझे गा लेकरू । नको मजसी अव्हेरू।।’ किंवा ‘ये ग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई।।’

तसेच पांडुरंग आपला उद्धार करणार याबद्दल त्या आशावादी आहेत. जनाबाईंच्या अभंगात विठ्ठलाची ही भक्तवत्सलता सर्वत्र विखुरलेली दिसते. —

''देव भावाचा लंपट। सांडुनि आला हा वैकुंठ।।
पुंडलिकापुढे उभा । सम चरणींची शोभा।''

मराठीतील सर्व संतकवींच्या अनुभवविश्वापेक्षा जनाबाईच्या कवितेतील अनुभवविश्वाचे वेगळेपण त्यांच्या वास्तवाधिष्ठित स्वरूपात दडपलेले आहे. जनाबाई आपल्या आध्यात्मिक जीवनातही आपले जीवनवास्त विसरू शकत नाही. नामदेवांच्या कुटुंबासाठी अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या एका उपेक्षित श्रमिकेचे ते भावविश्व आहे.

जनाबाईच्या या कष्टमय जीवनात विठ्ठल तिला साहाय्य करण्याकरिता धावून येतो याचा साक्षात्कार तिला येतो,

झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।। १।।
पाटी घेऊनि डोईवरी । नेऊनिया टाकी दूरी ।। २।।
''जनी जाय शेणासाठी । उभा आहे तिच्या पाठी ।
जनी जायं पाणीयासी। मागे धावे हृषिकेशी ।।

जनाबाई आणि चक्रपाणी यांच्यामधील हे नाते थेट अभिजात आणि स्वतंत्र वाटते.

**क्रांतिकारी संतश्रेष्ठ जनाबाई :—**

आध्यात्मिक प्रवासातील काव्यरचनेत श्रीविठ्ठल, पंढरपूर, नाममाहात्म्य, संतसमागम, कृष्णाची, बालक्रीडा इत्यादी विषय व व्यवसायपर रूपके अशा बऱ्याच गोष्टी समकालीन संताच्या रचनेत आढळतात. याशिवाय संत जनाबाईचे वेगळेपण किंवा त्यांची प्रेरक बाब म्हणजे, त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिगत भावविश्व हेच होय. तसे वैयक्तिक पातळीवर त्यांना आलेली आध्यात्मिक अनुभूती हेच त्यांच्या काव्याचे वेगळेपण होय. यात स्त्री आणि अस्पृश्यता या दोन कष्टमय, अपमानजनक गोष्टी यांचा काव्यातून झालेला आविष्कार. तसेच देवाचे केलेले पुरूषीकरण आध्यात्मिक प्रवासातील स्त्रीचे स्वातंत्र, देवासी केलेला समागम आणि मोक्षापेक्षा पुनर्जन्माचे महात्म्य या गोष्टी संतजनाबाईच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे द्योतक ठरल्या आहेत.

जनाबाईची कविता वैयक्तिक अनुभवविश्व आध्यात्मिक अनुभव यांची सांगळ घालत प्रवास करते तेव्हा त्यांच्या कवितेचे विकसन रूप श्रेष्ठत्वाची अनुभुती देते.

**लौकिक व्यथा :—**

जनाबाईच्या अभंगातून स्वतंत्र आध्यात्मिक जीवनाबरोबरच भावनिक आंदोलने प्रतिबिंबीत झालेली बाब लक्षणीय आहे.

भक्तीजीवनाच्या प्राथमिक अवस्थेत जनाबाई आपल्या अनाथपणाचे पोरकेपणाचे दुःख विठ्ठलास निवेदन करून पाहते.

''माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।
मी तुझे गा लेकरू । नको मजशी अव्हेरू ।।

**किंवा**

हरी रे मज कोणी नाही । माझी खात उसे डोई ।।

**अन्यायाविरूद्ध विद्रोह :—**

आपणास उपेक्षित जीवन जगावे लागते याबद्दल जनाबाईनी खंत व्यक्त केली आहे. आपण हलक्या जातीचे आहोत हे शल्य ती तीव्रपणे, ठळक शब्दात कोणास न घाबरता काव्यात मांडते. नामदेवांच्या घरात जनाबाईला स्थान नाही असेलच तर ते दारातच आहे ही गोष्ट ती आवर्जुन मांडते.

‘‘राजाई गोणाई । अखंडित तुझे पायी ।।
मज ठेवियले द्वारी । नीच म्हणोनि बाहेरी ।।
नारा गोंदा महादा विठा । ठेवियले अग्रवाटा
देवा केव्हा क्षेम देसी । आपुली म्हणोनी जनी दासी ।।

संत नामदेवाच्या घरी आश्रयाला असताना जनाबाईच्या कुटुंबाकडून जी अस्पृश्यतेची वागणूक मिळते ती सामाजिक विषमतेचे प्रतिक जनाबाईच्या अभंगातून पाहावयास मिळते.

तसेच जनाबाईच्या कवितेत परमेश्वर वियोगापेक्षा मीलनाची बेहोषी फार वेगळया वळणावर पोहचते तेव्हा त्याच्या स्वयंभू अभिव्यक्तीचे, अनुभवविश्वाचे उच्च शिखर गोठते. आपल्या सख्य भक्तीने जनाबाईनी श्रीकृष्णास जणू जिंकले आहे, हा श्रेष्ठभाव त्यांच्या कवितेत अनेकदा येतो.

‘‘रागा येऊनि काय करिसी । तुझे बळ आम्हापाशी
नाही सामर्थ्य तुज हरि । जनी म्हणे धरिला चोरी ।।

**किंवा**

‘‘धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर ।।
हृदय बंदिखाना केला । आंत विठ्ठल कोंडिला ।।

अशाप्रकारे श्रीकृष्ण विठ्ठलच जनाबाईचा दास झाला. जनाबाई वागवील तसा तो दास्यभावाने वागत आहे. हा जनाबाईच्या काव्यातला विकसन भाव मजेदार आहे आणि त्याहीपुढे त्यांचे विकसन जेव्हा

‘‘अरे विठया विठया । मूळ मायेच्या कारटया ।
तुझी रांड रडकी जाली । जन्म सावित्री चुडा ल्याली ।।
तुझे गेले मढें । तुला पाहून काळ रडे ।।
उभी राहुनि आंगणी । शिव्या देत दासी जनी ।।

अशा शिव्या देत देवाला सामान्य पातळीवर आणणे व त्याचे श्रेष्ठत्त्व मान्य करूनही मनुष्य पातळीवरून त्याला अनुभवत त्यांच्यातला व आपल्यातलाही दुरत्व नाहीसे करणे हे फार महत्त्वाचे आहे.

तसेच मोक्षप्राप्तीपेक्षा जन्मोजन्मी माणसाने विश्वात यावे आणि वारंवार या जीवनाचा आनंद घ्यावा म्हणून देवाला

‘‘देवा देई गर्भवास । तरीच पुरेल माझी आस ।।
परी हे देखा रे पंढरी । सेवा नामयाचे द्वारी ।।
करी पक्षि कां सूकर । श्वान श्वापद मार्जार ।।
ऐसा होते माझे मनी । म्हणे नामयाची जनी ।।’

अशाप्रकारे पुनर्जन्माची केलेली मागणी हे एक वारकरी संप्रदायातील जनाबाईचे विद्रोही क्रांतिकारी पाऊलच आहे.

तसेच ग्रामीण स्त्री सभ्यतेच्या मर्यादा ओलांडून जेव्हा संघर्षाचा पवित्रा धारण करू शकते याचे स्फोटक प्रारंभिकक्षण प्रथमत:च जनाबाईच्या अभंगातून खालीलप्रमाणे व्यक्त झाला आहे.

‘‘डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी जाईन मी ।।

स्त्री—पुरूष विषमता हे मानवी उच्च तत्त्वज्ञान होवूच शकत नाही. सनातनी धर्मात स्त्रीला दिलेले गौण स्थान जनाबाईला मान्य नाही. स्त्री—पुरूष समानता ही मानवी जीवनाची अवश्योपाधी असावी ही अभिलाषा जनाबाईच्या अभंगातून व्यक्त होते. हे ही फार मार्मिक आहे.

‘स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास ।
साधुसंतां ऐसें केले मज ।।

अशाप्रकारे जनाबाई हे विलक्षण सतेज बुद्धी लाभलेली स्वतंत्र बान्याची कवयित्री होय. तिचे स्त्रीमन भावसंपन्न आहे, सशक्त आहे. ल.रा. नसिराबादकरांनी‘जनाबाईच्या स्त्रीमनाचा हळूवारपणा आणि भक्तीची उत्कटता त्यांच्या सर्व अभंगांमध्ये ओथंबलेली दिसते.’ असे त्यांच्याविषयी मत व्यक्त केले आहे ते खरे वाटते.

## समारोप :—

जनाबाईचे जीवन आणि त्यांची कविता हयातील अद्वैत रूप फार महत्त्वाचे आहे. नामदेवांची सगुणभक्ती आणि ज्ञानेश्वरांची निर्गुणसाधना यांचे ऐक्य त्यांच्या आध्यात्म साधनेची विशेषता आहे. शुद्र दासीपदापासून संतपदापर्यंतचा तिचा प्रवास स्वयंप्रेरणा स्वरूपी असा आहे. संत साक्षात्कारी जनाबाई फार चमत्कारिक व्यक्तीमत्त्व ठरल्या आहेत. जनाबाईने स्वत:चे एक सामर्थ्यशाली संत कवयित्रीचे व्यक्तिमत्त्व निर्माण केले आहे. त्याचे स्वत:चे एक स्वतंत्र अनुभवविश्व त्यांच्या कवितेतून साकार झाले दिसते.

जनाबाई उपेक्षित समाजाच्या प्रतिनिधी म्हणून त्यांच्या लोकभाषेत लोकसंवाद साधतात. स्त्री—शुद्रांनाही भक्तिसाधनेने आत्मोद्धार करता येतो, संतपद प्राप्त करता येते हे स्वानुभवाने सिद्ध करतातच आणि अस्पृश्य दलित व शुद्र स्त्री म्हणून मिळणाऱ्या जीवनाची अवहेलना निर्मिडपणे काव्यातून व्यक्त करणाऱ्या पहिल्या संतकवयित्री ठरतात व त्यांचे याबाबतीतले दु:ख—वेदना हया पुढील मराठी काव्याच्या वेदना आणि विद्रोहाचे आदिरूपही ठरतात. जनाबाईची स्वानुभूती प्रकट करण्याची अशी स्वयंभू भाषाशैली प्रेरणादायी आहे. तिच्यातील उपेक्षित आणि स्त्रीमनाचे वास्तव रंग, आकार आणि वळणे भावकविंच्या काव्याला प्रेरणादायक ठरणारी आहेत.

तेराव्या शतकातील संत साहित्यातील इतिहासात संत जनाबाईची कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीकोनातून स्वयंभू, स्वतंत्र सर्वश्रेष्ठ व नाविण्यपूर्ण क्रांतीकारी कविता ठरली आहे. म्हणून संतमंडळीतच नव्हे तर एकूणच मराठीकाव्य—विश्वातील त्यांचे स्थान स्त्री कवयित्री म्हणून मौलिक स्वरूपाचे ठरले आहे.

## संदर्भग्रंथ :—

१. इर्लेकर सुहासिनी, प्राचीन मराठी कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८०.
२. इर्लेकर सुहासिनी, संत जनाबाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, २००२.
३. देशपांडे अ.ना., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६९.
४. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७.